# भगवा फडकवण्यासाठी कामाला लागा-खासदार चंद्रकांत खैरे
# शिवसेनेच्या वाहनरॅलीचा वैजापूरात झंझावात,
# हिंदूजनजागरण सप्ताह निमित्त भव्य वाहनरॅली

**वैजापूर दि.४** - शिवसेना संभाजीनगर शाखेच्या ३१व्या वर्धापनदिनानिमित्त हिंदू जनजागरण सप्ताह निमित्त शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेलया भव्य वाहनरॅलीने वैजापूरात भगवा झंझावत निर्माण करुन वातावरण भगवेमय झाले होते. प्रत्येक संस्थेवर भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे सांगत येत्या आठ जून च्या शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले. या कार्यक्रमास शिवसेना नेते खासदार संजय राऊत पदाधिकार्यांना मार्गदर्शन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतमालाला भाव द्या, कांद्याला भाव द्या. शेतक-यांना साथ दया. अशा मागण्या रॅलीत कर-यात आल्या. शिवसेना जिंदाबादच्या गगनभेदी गर्जनांनी वैजापूर शहर दणानून गेले होते. शिर्डी रोडवर सुरुवात झालेल्या रॅलीचा समारोप जगतगुरु संत तुकारात सभागृहात झाला. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास यावेळी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. शिवसेनाप्रमुख, मॉसाहेबांनी मुलासांरखे प्रेम प्रत्येक शिवसैनिकाला दिले. प्रत्येक समाज घटकाला न्याय मिळावा यासाठी उध्दवजी ठाकरे काम करत आहेत. शेतक-यांच्या पाठीशी फक्त खंबीरपणे शिवसेना उभी राहिली. हि शिवसेनेची यशस्वी वाटचाल सुरु आहे. सुवर्णमहोत्सवी वर्षात वाटचाल करतांना शिवसेनेच्या कामांचा आलेख उंचावला आहे. जनसामान्यांची साथ शिवसेनेला असून दिलेला शब्द पाळले जात आहे. या जमेच्या बाजू लक्षात घेवून शिवसेना घराघरात पोहोचावी यासाठी शिवसेनेचे मदतकार्य घराघरात पोहोचवण्याचे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

शेतकरी कर्जमुक्त व्हावा यासाठी शिवसेना कार्यरत असून शेतक-यांच्या सुख-दुःखात शिवसेना खंबीरपणे उभी आहे व या पुढेही राहिल. फक्त बोलत नसून शिवसेना जनसामान्यांसाठी काम करते. अशा संघटनेत काम करत असलयाचा अभिमान असलयाचे माजी आमदार आर एम वाणी यांनी सांगितले. संभाजीनगरला सुरक्षा देत शेतक-यांना ताठ मानेने जगण्याचसाठी संरक्षण व स्वाभिमान शिवसेनेने दिला आहे. शिवसेनेची सत्ता नसताना जिलहयाचा विकास केला. सत्तेत विकासाच्या माध्यमातून परिवर्तण करण्याचे काम शिवसेना करत आहे. ३१व्या वर्धापन दिवस साजरा करतांनी ज्यांनी शिवसेनेला उभे केले अशा प्रत्येक शिवसैनिकाला जपण्याचे काम आपलयाला करायचे आहे. आगामी काळात स्वबळावर भगवा झेंडा फडकवायचा आहे. त्यासाठी पराभवाचे आत्मचिंतन करुन भगवा झेंडा फडकवण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख अंबादास दानवे यांनी केले. २००० शेतक-यांना बि-बियाणे शिवसेना मोफत देणार असलयाचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख बाबसाहेब जगताप, तालूकाप्रमुख रमेश बोरणारे, ॲडव्होकेट आसाराम रोटे, साबेरभाई, कचरु डि के, मनाजी मिसाळ, आनंदीताई अन्नदाते, सुलभा भोपळे, खुशालसिंग राजपूत, संजय निकम, नंदकुमार शिंदे, प्रकाश चव्हाण, राजेद्र साळूंके, लिमेश वाणी, अखिल शेख, महाविर बाफना, प्रमोद कुलकणी, भाऊसाहेब गलांडे, सुनिल गायकवाड, सुनिल कदम, वसंत त्रिभुवन, मोहन साळुंके, प्रकाश मतसागर, भिमाशंकर तांबे, शिवलिंग साकळे, सचिन वाणी, योगेश गायकवाड, बंडू जगताप, कलयाण जगताप, छाया बोरणारे, ज्ञानेश्वर टेके, राजेंद्र मगर, रामदास वाघ, खलील शेख, अमेर अली, विठठल पगार, पी एस कदम, अशोक हडोळे, श्रीराम गायकवाड, अजिंक्य निकम, अक्षय कुलकर्णी, महेश फस्के, रवि पगारे, विजय काळे, माणिक निबोटे, सुदाम गोरे, श्रीकांत साळुंके, शांताबाई राऊत, परसराम मोईन, मान्सूक मगर, विष्णू जेजूरकर, बशिर सौदागर आदिसह शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**फोटो मेल केला आहे.** **योगेश पायघन / गणेश वाघ.**